स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई, जिल्हा बीड.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE & HOSPITAL AMBAJOGAI , DIST BEED.

PH NO 02446/248438,247060 FAX – 02446/247132

No.SRTRGMCH/P.Store/4309 /2022 Date - 09 /06/2022

**लोखंडी कुशन असलेली/ ऑफीसर खुर्ची मोठी (व्हील असलेली ) बसण्यासाठी बाक लोखंडी किंवा स्टिलचे वर सनमाईक असलेले / सिंगल कॉट (लोखंडी) साहित्य खरेदीकरिता दरपत्रक सुचना**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील पोलीस चौकीकरिता लागणारे लोखंडी खुर्ची कुशन असलेली/ ऑफीसर खुर्ची मोठी (व्हील असलेली ) बसण्यासाठी बाक लोखंडी वर सनमाईक असलेले किंवा स्टिलचे/ सिंगल कॉट (लोखंडी )हे साहित्य खरेदीकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चीत पत्र निघाल्याच्या दिवसापासुन सहा महीन्याकरिता राहील.

सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख १8 /06/२०२२ दुपारी ५.०० वाजे पर्यंतची असुन दिनांक 20 /06 /२०२२ रोजी सकाळी/ दुपारी ५.०० वाजता मा.वैद्यकिय अधिक्षक, यांचे दालनात दरपत्रके उघडण्यात येतील. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहाता येईल. दरपत्रक मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, यांचे नावे रुग्णालय आवक विभागात सादर करावयाचे असुन ,दरपत्रकाच्या लिफाफयावर लेखन सामुग्री व किरकोळ साहित्य खरेदीकरिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे .तसेच दरपत्रकावर पुरवठादाराने स्वत: चे दुकानाचे नाव नमुद करणे आवश्यक राहील. तसेच दर हे पुरवठादाराने त्याचे लेटरहेडवर खालील नमुण्यात त्याच क्रमाने देण्यात यावे. जिथे दर द्यायचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येऊ नये. तसेच **दरपत्रकासोबत पुरवठादाराने दुकान नोंदणी प्रमाणपत्र ,पॅन कार्ड ,आधार कार्ड व जीएसटी क्रमांक प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील. तसेच या दरपत्रक सुचनासोबत निवीदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना सादर करणे आवश्यक आहे.**

**सर्व दर हे दरपरिमाना करिता सर्व कर सामाविष्ट करुन नमुद करावे.** अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर निश्चीत झाल्यावर आवश्यकतेनुसार बाब निहाय न्युनतम दर देणा-या पुरवठादाराचे नाव /दर निश्चीत करण्यात येईल. त्यानुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येतील. आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसामध्ये वस्तुचा पुरवठा करावा लागेल. व त्याचे मुळ देयक तिन प्रतीत मा.अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, यांचे नावाने देयक सादर करावे लागेल. **खालील दर्शविलेल्या साहित्याचा दर्जा उत्तम असावा अन्यथा साहित्य निकृष्ट दर्जाचे पुरवठा केले तर स्विकारले जाणार नाही याबाबतची नोंद पुरवठादारांनी घ्यावी.**

| अनुक्रमांक | साहित्याचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | खुर्ची (लोखंडी कुशन असलेली) | |
| २ | ऑफीसर खुर्ची मोठी (व्हील असलेली ) | |
| ३ | बसण्यासाठी बाक (लोखंडी / स्टिलचे आणि वर सनमाईक असलेले) | |
| ४ | साधे कॉट सिंगल (लोखंडी) | |

To website. [illegible] 10/6/22

अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई

प्रत :- प्रशासकीय कार्यालय नोटीस बोर्ड /विबसाईड स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रु.अंबाजोगाई.

# <u>प्रपत्र- अ</u>

## निवीदाकरांनी दयावयाचा हमीपत्राचा नमुना

मी/ आम्ही / आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रिये मध्ये भाग घेणा-या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.